MHKO100003242022

**<u>किरकोळी दिवाणी अर्ज क्र. १९/२०२२</u>**

बसवराज उर्फ बसाप्पा रामू हालगडगी.
/वि/
कै. शिवराम रामू हालगडगी (मयत वारस).

**<u>निशाणी क्र. २२ व २३ वर आदेश</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होणेसाठी व दावा अवसानाचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. वि.प. तर्फे अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी सदरचा दावा हा दरम्यानचे उत्पन्नाची चौकशी हावून ते ठरवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, मयत अर्जदार बसाप्पा रामू हालगडगी हे दिनांक ०८/०३/२०२५ रोजी मयत झालेले आहेत व प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक १२/१२/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, वि.प.च्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत वि. प. विरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे अर्जदार उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, अर्जदार यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत अर्जदार यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. अर्जदार यांचे असे कथन आहे की, यातील अर्जदार यांनी मयताचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून अगर हेतुपुरस्सर विलंब अगर टाळाटाळ केलेली नाही. सदर कामातील अर्जदार यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे व न्यायाचे होते परंतु यातील मयत अर्जदार यांचे वारस अर्जदार नं. १/१ विजया हालगडगी या पत्नी असून वयस्कर आहेत व त्या वारंवार आजारी असतात तसेच अर्जदार नं.१/२ श्रुती हालगडगी ही मयताची मुलगी असून १/३ रविशंकर

हालगडगी व १/४ गिरीराज हालगडगी हे मयत अर्जदार यांची मुले आहेत व १/२, १/३ व १/४ हे नोकरीनिमित्त बाहेरगावी राहतात त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता मयत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत अर्जदार यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई वि.प. यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज रक्कम रु.३००/- (रुपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. मयत अर्जदार बसाप्पा रामू हालगडगी यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

SACHIN DURGASHANKAR MEHTA

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.07.02 17:37:56 +0530

**( एस. डी. मेहता )**
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः०२/०७/२०२६.